# // आवाहन //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते कि, महानगरपालिका आयुक्त, संजय श्रीपतराव काटकर(भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनानुसार SUNDAY GARDEN या उपक्रमांचे आयोजन  करण्यात येणार आहे. या उपक्रमाचे सामाजिक व सांस्कृतिक मुल्यांची जागृती करणे, नागरिकांचा सहभाग मिळविणे, नागरीकांचे मनोरंजन होणे ही उद्दीष्टे आहेत.

त्या दृष्टीने महानगरपालिकेतर्फे दि.२६/११/२०२३ ते दि.२८/०२/२०२४ या कालावधीत येणा-या प्रत्येक रविवारी SUNDAY GARDEN हा उपक्रम खालील उद्यानांमध्ये राबविण्यात येणार आहे.

१) सालासार हनुमान उद्यान, भाईंदर (प.)

२) जेसल पार्क चौपाटी, भाईंदर (पु.)

३) ज्ञान ज्योती सावित्रीबाई ज्योतिबा फूले उद्यान (आरक्षण क्र.२६९), कनकिया मिरारोड (पु.)

उपरोक्त कालावधीत येणा-या प्रत्येक रविवारी SUNDAY GARDEN हा उपक्रम साजरा करण्यासाठी स्थानिक कलाकारांच्या कला गुणांना वाव देण्याच्या दृष्टीने तसेच उद्यानांमध्ये येणा-या नागरीकांचे मनोरंजन करण्याच्या दृष्टीने स्थानिक कलाकारांकडून त्यांची कला (उदा. गायन, नृत्य, चुटकुले सांगणे, जादुचे प्रयोग, मिमिक्री करणे वगेरे) सादर करण्याच्या दृष्टीने दि.१८/११/२०२३ ते दि.२२/११/२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या garden@mbmc.gov.in या ई-मेल आयडी वर अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर प्राप्त अर्जामधुन स्थानिक कलाकारांची निवड करण्यात येऊन त्याप्रमाणे त्यांची कला सादर करण्यासाठी दि.२६/११/२०२३ ते २८/०२/२०२४ या कालावधीमध्ये येणारे रविवार उपलब्ध करुन दिले जाईल.

महानगरपालिकेतर्फे सदर कलाकारांना त्यांची कला सादर करण्यासाठी Karaoke, माईक व स्पिकर यांची व्यवस्था करण्यात येईल. स्थानिक कलाकारांना त्यांची कला विनामुल्य सादर करावी लागेल याची स्थानिक कलाकारांनी कृपया नोंद घ्यावी.

तरी SUNDAY GARDEN या नाविन्यपूर्ण उपक्रमात जास्तीत जास्त स्थानिक कलाकारांनी सहभाग घेऊन सदर उपक्रम यशस्वी करण्यासाठी महानगरपालिकेस सहकार्य करावे, ही विनंती.

(कल्पिता पिंपळे)
उप आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

---

# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

महानगरपालिका मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प), ता.जि.ठाणे-४०१ १०१. दुरध्वनी क्र.२८१९२८२८

जा.क्र. मनपा/उद्यान/ ४५३ /२०२३-२४

दिनांक : १७/११/२०२३

प्रति
**जनसंपर्क अधिकारी,**
**जनसंपर्क विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय :- SUNDAY GARDEN उपक्रमाचे आवाहन करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरीकांना महानगरपालिकेतर्फे दि.२६/११/२०२३ ते दि.२८/०२/२०२४ या कालावधीत येणा-या प्रत्येक रविवारी SUNDAY GARDEN हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. याबाबत जनजागृती करुन सदर उपक्रम यशस्वीपणे पार पाडणेकामी मिरा भाईंदर शहरातील नागरीकांना व कलाकारांना आवाहन करणे आवश्यक असुन सोबत जोडलेले आवाहन पत्र वृतपत्रात प्रसिद्ध करण्यात यावे.

(कल्पिता पिंपळे)
**उप.आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सोबत — आवाहन पत्र**